जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या
अध्यक्षपदावर पदस्थापना करणेबाबत..

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रुम नं.१,२,५ व ६,
हजारीमल सोमाणी मार्ग, सि.एस.टी.स्टेशन समोर, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी क्र.०२२-२२०७ २०९७ / २२०५७४०९ E-mail : mah-sforum@nic.in

क्र.राआ/महा./आस्था-३/नि व प/अध्यक्ष जि.मं./२०१५/६४७८ दिनांक ०७/१०/२०१५

**वाचा** :- १) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ व त्याखालील नियम
२) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या पुर्णवेळ अध्यक्ष व सदस्य गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०११
३) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.७७/ग्रासं-४, दिनांक २३ सप्टेंबर, २०१५

## -: कार्यालयीन आदेश :-

वरील संदर्भिय क्र.३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षपदी विहीत अटींच्या अधीन राहून आपली पुनर्नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदरच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ मधील तरतुदीस अनुसरुन या आदेशाद्वारे पुढील आदेशापर्यंत आपली पदस्थापना **नागपूर** जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षपदावर (श्री.एम.जी.चिलबुले यांच्या बदलीने रिक्त होणा-या) करण्यात येत आहे. तसेच पुढील आदेशापर्यंत आपले मुख्यालय **नागपूर** जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच हे राहिल. तरी आपण मुख्यालय असलेल्या जिल्हा मंचाच्या सदरील पदावर तात्काळ व कोणत्याही परिस्थितीत संदर्भिय क्र.३ चा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे आंत रुजू व्हावे.

हे आदेश मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र यांच्या पूर्वमान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

०७/१०/२०१५

(अनुजा सा. वैरागडे )
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

प्रति,
श्री.रामलाल भंवरलाल सोमानी,
सोमानी भवन,
मनकर्णा प्लॉटस, अकोला-४४४ ००१ (मार्फत प्रबंधक, जिल्हा मंच, अकोला)
सोबत : संदर्भिय शासन निर्णयाची प्रत

D:\SC MAH\STATE COMMISSION\apt\Posting Orders-President.doc

**प्रतिलिपी :**

१) मा.न्यायिक सदस्य व मा.सदस्य, राज्य आयोग, महाराष्ट्र
२) मा.पालक सदस्य, नागपूर जिल्हा मंच
३) मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) मा.सदस्य व मा.सदस्या, जिल्हा मंच, नागपूर
५) प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद परिक्रमा खंडपीठ
६) प्रबंधक, जिल्हा मंच, अकोला यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी या आदेशाची व त्यासोबत जोडलेल्या शासन निर्णयाची प्रत वरील मा.श्री.सोमानी यांना तात्काळ व आजच हस्तबटवड्याने विशेष दुतामार्फत पोच करावी व त्याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयास उलटटपाली सादर करावा.
७) प्रबंधक, जिल्हा मंच, नागपूर यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी उक्त मा.श्री.सोमानी यांना मंचाचे अध्यक्षपदावर रुजू करुन घेण्याबाबतची कार्यवाही पुर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

ASW 01/10/15

(अनुजा सा. वैरागडे )
प्रबंधक विधी,
राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई

**ग्राहक संरक्षण अधिनियम,१९८६**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या
अध्यक्षांची पुनर्नियुक्ती करण्याबाबत.

राज्य आयोग, महाराष्ट्र, मुंबई
आवक क्र. 7300
दिनांक: 25/09/15
आवक लिपिक स्वाक्षरी
प्रबंधक स्वाक्षरी 28/09/15

**महाराष्ट्र शासन**
अन्न,नागरी पुरवठा व ग्रासक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.७७/ ग्रासं. ४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३४
दिनांक:- २३ सप्टेंबर, २०१५

वाचा : १ ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६व त्याखालील ग्राहक संरक्षण नियम २०००.
२ राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.राआ/महा/आस्था-३/ जि.म.अध्यक्ष/पुनर्नियुक्ती/२०१५/११३, दि.१०.६.२०१५

शासन निर्णय :-

ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ च्या तरतुदींनुसार ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी राज्यामध्ये राज्य आयोग व जिल्हा मंचाची स्थापना करण्यात आली आहे. सदर कायद्याच्या कलम-१० अन्वये प्रदान करण्यात आलेले अधिकाराचा वापर करून खालील जिल्हा तक्रार निवारण मंचाचे अध्यक्ष यांची त्याच पदावर पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

१. श्री.रामलाल भवरलाल सोमानी, सोमानी भवन, मनकर्णा प्लॉट्स, अकोला-४४४००१
२. श्री.शरद दिगंबर मडके, ५०१, वकील नगर,एरंडवणे,पुणे-४

त्यांची पुनर्नियुक्ती खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे:-

१) ही नियुक्ती वैद्यकीय तपासणी व पोलीस पडताळणी अहवालाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. सदर अहवाल योग्य नसतील/त्यात प्रतिकूल शेरे असतील तर त्यांची नियुक्ती रद्द होईल.
२) जिल्हा मंचाचे वरील अध्यक्षांची पुनर्नियुक्ती ५ वर्षासाठी किंवा त्यांच्या वयाच्या६५ वर्षे पूर्ण होईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यत राहिल. जिल्हा ग्राहक मंचाच्या अध्यक्षांची पदे सावधी नियुक्ती असतील नियुक्त केलेल्या व्यक्ती राज्य आयोगाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करते.
३) जिल्हा मंचाच्या वरील अध्यक्षांना महाराष्ट्र ग्राहक संरक्षण अधिनियम-२००० च्या नियम ३ मधील पोटकलम (१) मधील तरतुदींनुसारे प्रकरणपरत्वे वेतन/मानधन देय राहील.
४) जिल्हा मंचाचे वरील अध्यक्ष जिल्हा मंचाच्या कामासाठी दौऱ्यावर असताना राज्य शासनाच्या प्रथमश्रेणी अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेला प्रवास व दैनिकभत्ता मिळण्यास पात्र असतील. परंतु त्यांना विमान प्रवास तसेच वातानुकुलित प्रथम वर्गाचा रेल्वे प्रवास अनुज्ञेय असणार नाही.
५) जिल्हा मंचाच्या वरील अध्यक्षांना महाराष्ट्र ग्राहक संरक्षण अधिनियम, २००० मधील नियम-३ (४) च्या तरतुदी व सदर नियमामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार त्यांना त्यांच्या पदावरून दूर करता येईल.
६) लोकहितास्तव किंवा प्रशासकीय कारणास्तव आवश्यक वाटल्यास त्यांची बदली राज्यातील इतर कोणत्याही जिल्हा मंचावर करण्यात येईल. कामाचा भार किंवा प्रलंबित प्रकरणे विचारात घेता राज्य आयोग ठरविल त्यांप्रमाणे दोन जिल्हा मंचांना जोडून त्यांच्या सेवेचा उपयोग करून घेण्यात येईल.
७) जिल्हा मंचांच्या वरील अध्यक्षांच्या सेवाविषयक अन्य बाबी किंवा शर्ती ग्राहक संरक्षण कायदा,१९८६ व महाराष्ट्र ग्राहक संरक्षण नियम,२००० व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार नियमित होतील.
८) नियुक्तीचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांत सर्वश्री. सोमानी व श्री.मडके यांनी पदभार न स्विकारल्यास, त्यांची नियुक्ती आपोआपच रद्दबातल होईल.

२. जिल्हा मंचाच्या वरील अध्यक्षांची सविस्तर पदस्थापना राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडून करण्यात येईल. तसेच सदर उमेदवारांची नियुक्ती त्यांनी विहित नमुन्यातील शपथपत्र व हमीपत्र लिहून दिल्यानंतर व त्यांनी त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर प्रभावी होईल.

३. उपरोक्त बाबींसाठी होणारा खर्च मागणी क्रमांक: एम-२,२४०८-अन्न साठवण व वखार साठवण (०४) ग्राहक संरक्षण अधिनियम,१९८६ अन्वये राज्य परिषद , राज्य आयोग आणि जिल्हा मंच स्थापन करणे (०४) (०२) मुफसल (२४०८ ०२६२) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो मंजूर अनुदानातून भागवावा.

(उ.बा. पाटकर)
कार्यासन अधिकारी

१) मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
२) मा.मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे खाजगी सचिव,
४) महालेखापाल- (लेखा व अनुज्ञेयता), १/२, मुंबई/नागपूर, महाराष्ट्र
५) महालेखापाल- (लेखापरिक्षा) १/२ ,मुंबई/नागपूर, महाराष्ट्र
६) मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
७) श्री.रामलाल भवरलाल सोमानी, सोमानी भवन, मनकर्णा प्लॉट्स, अकोला-४४४००१
८) श्री.शरद दिगंबर मडके, ५०१, वकील नगर,एरंडवणे,पुणे-४
९) संग्रहार्थ.